International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.8 No.2 Nov – Dec 2020

# भारतातील बेरोजगारी : एक वाढती समस्या

**प्रा. डॉ. शिंदे एस. आर.**

(अर्थशास्त्र विभाग)

कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव ता. खटाव जि. सातारा

**Corresponding Author: प्रा. डॉ. शिंदे एस. आर.**

**Email:** sangramshinde730@gmail.com

**प्रस्तावना:**

भारत हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. कारण भारतात सर्वात जास्त तरुणांची संख्या आहे. भारतात चीनपेक्षा जास्त युवक राहतात. अर्थशास्त्रात असे म्हटले जाते की, युवक ही देशाची कर्ती लोकसंख्या असते. तीच खरी देशाची संपती असते. जो देश युवकांमध्ये भांडवली गुंतवणूक करतो तो देश झपाट्याने विकसित होतो .त्यासाठी युवकांच्या संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीला अधिक महत्व दिले जाते. ज्या देशात युवकांना योग्य दिशा दिली जाते त्या देशाची सर्वांगीण प्रगती होत असते.भारतात लोकसंख्या तीव्र गतीने वाढत आहे, राष्ट्रीय उत्पन्नाचा दर ही वाढत आहे परंतू बेकरीचा दर कमी न होता वाढत आहे ही बाब गंभीर आहे.

भारत हा विकसनशील देश मानला जातो. ज्या गतीने द्वितीय आणि तृतीय क्षेत्राची प्रगती होत आहे, त्याची राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सेदारीही वाढत आहे त्याच गतीने प्राथमिक म्हणजे कृषि क्षेत्राची राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सेदारी कमी होत आहे यावरून असा निष्कर्ष काढला जातो की, भारत विकसनशीलतेकडून विकसित देशाच्या श्रेणीमध्ये जाऊ शकतो अशी शक्यता जास्त दिसते. परंतु दुसरीकडे आर्थिक विषमता, दारिद्रय, बेरोजगारी यासारख्या समस्या ही वाढत आहेत. एकीकडे लोकसंख्या तीव्र गतीने वाढत आहे तर दुसरीकडे बलाढ्य उद्योगातून कामगारांची संख्या कमी केली जात आहे त्यामुळे रोजगार वाढीऐवजी कमी होत आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर या समस्या कमी करण्यासाठी सरकार अनेक प्रयत्न करीत आहेत परंतू कोविड -१९ या जागतिक महामारीमुळे बेरोजगारीची समस्या अधिकच तीव्र झालेली आहे. त्याचा देशाच्या सर्वांगीण प्रगतीवर व सामाजिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होत आहे.

**बेकारी किंवा बेरोजगारीचा अर्थ:**

लॉर्ड केन्सच्या मते, “व्यक्तीची काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही शिवाय दिले जाणारे रास्त वेतन स्वीकारण्याची तयारी असूनही कामधंदा न मिळणे म्हणजे बेरोजगारी होय.”

प्रा. पिगू यांच्या मते, “ रोजगार नसलेल्या परंतु रोजगार मिळवा अशी इच्छा असलेल्या व्यक्तीला ‘बेकार’ असे म्हणतात.”

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना यांच्या मते, “ काम करण्याची इच्छा व सामर्थ्य असूनही आणि प्रचलित वेतनावर कामाच्या शोधात असूनही ज्यांना काम मिळत नाही अशा सर्वांचा समावेश बेरोजगारीत करावा लागेल.”

**उद्देश:**

1.भारतातील बेकरीचे स्वरूप व व्याप्ती समजावून घेणे

2.बेरोजगारीतील दर कमी न होता वाढत का आहे यांच्या कारणांचा अभ्यास करणे

3.बेरोजगारी कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे

**संशोधन पद्धती :**

बेकारीच्या समस्येचा अभ्यास कालावधी १० वर्षाचा असून सन २०१० ते २०२० या कालावधीतील आकडेवारीचा आधार घेतलेला आहे. प्रस्तुत संशोधन पूर्णपणे दुय्यम साधनांवर आधारित आहे. त्यामुळे यासाठी आवश्यक असणारी शासकीय कागदपत्रे,अहवाल, इंटरनेट,वृत्तमानपत्रे, मासिके इ. आधार घेऊन घेतलेला आहे.

**गृहीतके:**

१. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीबरोबर बेकारी वाढत आहे.

२. सुशिक्षितमधील बेरोजगारीचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधन पेपर लिहण्यासाठी दुय्यम साधनांचा आधार घेतलेला आहे. यासाठी इंटरनेट, संदर्भ पुस्तके, शासकीय अहवाल आणि इतर लेख यांचाही आधार घेतलेला आहे.

**भारतातील बेरोजगरीचे स्वरूप आणि व्याप्ती:**


ठोबळमानाने असे स्पष्ट करता येते की, सन १९५१ मध्ये भारतात २.५ द. ल. व्यक्ति बेकार होते असे श्री. बी. एम. दातार आणि श्री. आर. सी. भारद्वाज यांच्या अभ्यासावरून स्पष्ट होते तर श्री. भगवती समितीच्या १९७३ मध्ये मधील अहवालावरुन भारतात एकूण १८.७ द. ल. व्यक्ति बेकार होते. त्यात वाढ होऊन २००९-१० मध्ये ४० द. ल. बेरोजगारांची संख्या भारतात होती असे लेबर ब्यूरो पाहणीतून समजते.

नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर भारतात बेरोजगारीचे प्रमाण वाढत गेले. ILO च्या डाटा बेस नुसार २००८ मध्ये ५.३६ टक्के बेकरीचा दर होता २०१३ मध्ये ५.६७ टक्के वाढला तर २०१९ मध्ये त्यात घाट होवून ५.२९ टक्के झाला. तर २०२० मध्ये पुनः बेकारीचा दर वाढून ७.११ टक्के झाला.

सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन एकॉनॉमीच्या(CMIE) कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत भारतात बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड वाढले. एप्रिल २०२० बेकारीचा दर ७.९७ टक्के होता तर २३ मे रोजी संपलेल्या आठवडयात १४.७ टक्के वाढला. हा दर पाकिस्तान बांग्लादेश, श्रीलंका या देशातील बेकारीच्या दरापेक्षा अधिक होता. ही बाब खालील स्तंभलेखात स्पष्ट केलेली आहे.

**स्तंभालेख १**

**इतर देशाच्या तुलनेत भारतातील बेकारीचा दर**





स्रोत: ILO डेटा बेस विश्लेषण

वरील स्तंभालेख १ मधील दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, २०२०-२१ मध्ये आपल्या शेजारील देश ज्यांना आपण गरीब समजतो अशा श्रीलंका,बांग्लादेश,नेपाळ,भूतान आणि पाकिस्तान मधील बेरोजगारीपेक्षा भारतातील बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे. जे जागतिक स्थरावरील सरासरी दरापेक्षा (६.४७ %) जास्त आहे.

कोविड-१९ या जागतिक महमारीच्या काळात भारतातच नाही तर जगातल्या विकसित देशाच्या अर्थव्यवस्था प्रभावी झालेल्या होत्या. त्या देशातही बेकारीचे प्रमाण प्रचंड वाढलेले होते. खालील स्तंभा लेखात पहा.

स्तंभालेख २. **जागतिक बेरोजगारी**



**IJAAR** **Vol.8 No.2** **ISSN – 2347-7075**


स्रोत: Lora Jones, Daniele Palumbo & David Brown, BBC News, 24 January 2021, (IMF

वरील स्तंभलेख २ मधील आकडेवारीवरून असे दिसून येते की, 2019 च्या तुलनेत 2020 मध्ये अमेरिका, फ्रांस, कॅनडा, इंग्लंड, जपान या सारख्या विकसीत देशात बेकारी वाढलेली होती. कारण कोविड-19 त्या काळात संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्था ठप्प झालेल्या होत्या. त्यामुळे नुकसान कमी करण्यासाठी कामगारांना कामावरून काढून टाकले होते. लोकांचे उत्पन्न कमी झाल्यामुळे यांची खरेदी शक्ति कमी झाली. त्यामुळे लॉर्ड केन्सच्या भाषेत प्रभावी मागणी कमी झालेली होती आणि ही परिस्थिति संपूर्ण जगातील देशात अनुभवास येत होती. त्यामुळे बेरोजगारीच्या वाढीचे स्वरूप जागतिक झालेले होते.

**स्थूल देशांतर्गत उत्पादन आणि बेरोजगरीचा दर:**

भारतातील बेरोजगारीच्या संदर्भात विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, भारतातील बेकारीचा दर वाढत आहे. खालील आकडेवारी पाहा.

स्तंभलेख ३:




स्रोत: BBC प्रतिनिधी -गणेश पोळ यांचा लेख (Centre for Sustainable Employment -State of Working India -9/10/2018)

वरील स्तंभालेख ३ मधील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, ज्या प्रमाणे स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढत आहे त्या प्रमाणे देशातील रोजगार वाढला नाही. आझीम प्रेमजी विद्यापीठातील स्टेट ऑफ वर्किंग इंडिया अहवालात म्हटले आहे की, भारताने ज्या क्षेत्रात रोजगार वाढीच्या संधी अधिक आहेत त्या क्षेत्रात कमी गुंतवणूक केली नाही, चीनने मात्र उद्योग, सार्वजनिक क्षेत्र, शिक्षण आरोग्य, आणि खेळ, बांधकाम, IT, वित्तीय सेवा इत्यादीमध्ये मोठी गुंतवणूक केल्यामुळे त्या देशात प्रचंड रोजगार वाढला असे प्रा. अमित बसोल यां नी BBC ला सांगितले.

वरील स्तंभलेखातील आकडेवारीवरून असे दिसते की 2004 ते 2011 या कालावधीत स्थूल देशांतर्गत उत्पादन 8.7 टक्के वाढले तर 0.1 टक्केच वाढले अर्थात देशाचे राष्ट्रीय उत्पादन ज्या क्षेत्रामुळे वाढले त्या क्षेत्रात रोजगार वाढला नाही असे म्हणावे लागते.

**सुशिक्षित बेरोजगार**

बेकारी ज्या प्रमाणे आशिक्षितांमध्ये आहे तशीत बेरोजगारी सुशिक्षितांमध्ये पण दिसून येते. शासनाचे शासकीय नोकऱ्याबाबतची भूमिका नकारात्मक असल्यामुळे अनेक शासकीय विभागात शेकडो पदे रिकामी आहेत. या पदाच्या पात्रतेचे उमेदवार उपलब्ध असून सुध्दा त्यांची त्या पदावर नियुक्ती केली जात नाही. म्हणून सुशिक्षित बेकारीचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. खालील तक्ता पहा.

तक्ता क्र. 1. सुशिक्षित बेरोजगारीचा दर

| पदवी | एकूण | | पुरुष | | महिला | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 2018-19 | 2020-21 | 2018-19 | 2020-21 | 2018-19 | 2020-21 |
| इंजिनियर | 11.2 | 23.5 | 9.43 | 22.2 | 37.25 | 42.6 |
| मेडिकल | 6.4 | 10.8 | 2.67 | 6.1 | 14.65 | 18.4 |
| कॉम्प्युटर | 14.2 | 22.6 | 10.56 | 16.7 | 37.96 | 51.5 |
| Agriculture | 11.4 | 29.4 | 00 | 32.1 | 34.07 | 26.8 |
| इतर विषयात पदवी | 15.5 | 16.1 | 6.66 | 8.1 | 39.39 | 35.2 |
| एम.फील / पीएच. डी. | 12.0 | 12.2 | 6.05 | 6.9 | 26.76 | 20.2 |
| एकूण | 14.9 | 16.1 | 6.75 | 8.8 | 37.98 | 33.8 |


स्रोत: Author’s Calculation based on LFS 2018-19 and 2020-21

वरील तक्तातील अकडेवारीवरू असे दिसून येते की, भारतात इंजिनियर, डॉक्टर,किंवा कॉम्प्युटर, पीएचडी यासारख्या सर्वोच्च पदव्या घेवून युवक बेकार होत आहेत त्याचे प्रमाण देशाच्या आर्थिक वृध्दी बरोबर वाढत आहे ही बाब गंभीर आहे.सन २०१८-१९ मध्ये इंजिनिअरिंगची पदवी घेवून बेकार राहणाऱ्या महिलांचे प्रमाण ३७.२५ टक्के होते ते वाढून २०२०-२१ मध्ये ४२.६ टक्के झाले. पुरुषांच्या बेकारीत ९.४३ टक्क्यांवरून २२.२ टक्के वाढ झाली. हीच स्थिती इतर पदवी घेणाऱ्या युवकांच्या बाबतीत दिसून येते.

**राज्यनिहाय बेरोजगारी**

खालील स्तंभलेखातील आकडेवारीवरून देशातील राज्यनिहाय बेरोजगारीचे विश्लेषण केलेले आहे.

स्तंभालेख ४:




स्रोत: Business Today May ०१, २०२०

वरील स्तंभालेख ४ मधील आकडेवारीचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, पाँडेचरी या केंद्रशासित प्रदेशामध्ये सर्वात जास्त बेरोजगारी आहे हे सर्वात कमी बेरोजगारी हिमाचल प्रदेशात आढळून आली.

**भारतामध्ये महिलांमध्ये बेरोजगारीचा दर सर्वाधिक आहे.**

नोकरदार महिलांसाठी भारत हा सर्वात वाईट देश आहे. OECD इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ इंडियामध्ये असे आढळून आले आहे की, OECD राष्ट्रांमधील महिला आणि पुरुषांच्या रोजगार दरांमध्ये देशात सर्वाधिक 52 टक्के फरक आहे. त्यानंतर तुर्कीचा क्रमांक 37 टक्के गुणांच्या फरकाने आहे. स्वीडन आणि नॉर्वे पाच टक्क्यांपेक्षा कमी गुणांच्या फरकासह श्रेणीत सर्वोत्तम आहेत.

एकूण बेकरीचा विचार केल्यास महिला व पुरुषांमध्ये बेकरीचे प्रमाण २०२१ च्या एप्रिल-जून मध्ये १२.२ टक्के पुरुष तर १४.३ टक्के महिला बेकार होत्या.

नोकरदार महिलांसाठी भारत हा सर्वात वाईट देश आहे.

**भारतात वाढत्या बेरोजगारीची कारणे:**

1. **जागतिक आर्थिक संकट (2008-2009):** 2008 च्या जागतिक आर्थिक संकटाने भारताच्या अर्थव्यवस्थेवर गंभीरपणे परिणाम केला, ज्यामुळे वाढ मंदावली आणि विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी कमी झाल्या.
2. **नोटाबंदी (2016):** 2016 मध्ये उच्च मूल्याच्या चलनी नोटा बंद करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे आर्थिक अडथळे निर्माण झाले, विशेषत: अनौपचारिक क्षेत्रात, परिणामी तात्पुरत्या नोकऱ्यांचे नुकसान झाले.
3. **वस्तू आणि सेवा कर (GST) अंमलबजावणी (2017):** GST ची सुरुवात कर रचना सुलभ करण्याचा उद्देश होता, परंतु यामुळे सुरुवातीला अर्थव्यवस्थेत अल्पकालीन व्यत्यय निर्माण झाला, ज्यामुळे व्यवसाय आणि रोजगारावर परिणाम झाला.
4. **कोविड-19 महामारी (2020):** कोविड-19 साथीचा रोग आणि त्यानंतरच्या लॉकडाऊन उपायांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर खोलवर परिणाम झाला, परिणामी व्यवसाय बंद झाल्याने बेरोजगारी वाढली आणि आर्थिक क्रियाकलाप ठप्प झाले.
5. **चलनवाढीचा दबाव:** भारतातील सध्याच्या बेरोजगारीच्या दरावर प्रभाव टाकून भारतालाही गेल्या काही वर्षांमध्ये महागाईच्या दबावाचा सामना करावा लागला आहे. उच्च महागाई दर ग्राहकांची क्रयशक्ती कमी करू शकतात, ज्यामुळे वस्तू आणि सेवांची मागणी कमी होते. याचा व्यवसायांवर मोठा परिणाम होऊ शकतो, परिणामी खर्चात कपातीचे उपाय, ज्यामध्ये टाळेबंदी आणि नियुक्ती फ्रीज समाविष्ट आहे, ज्यामुळे बेरोजगारीचा दर वाढतो.
6. नवीन आर्थिक धोरणाचा प्रभाव, नोकर भरती बंद, जीएसटी, अकार्यक्षम सरकारे, धर्मांदतेचे वेड, कुचकामी शिक्षण प्रणाली,वाढती लोकसंख्या, गरीबी, जागतिक माहमारी इ. कारणांमुळे बेरोजगारी वाढ होत आहे.

**उपाययोजना :**

देशातील बेकारी कमी करावयाचे असेल तर केन्सने म्हटल्याप्रमाणे प्रभावी मागणीत वाढ करावी लागेल आणि ही वाढ करण्यासाठी देशात अशा प्रकारचा रोजगार निर्माण केला पाहिजे की त्यामधून वस्तू व सेवांच्या वाढीपेक्षा श्रमिकांच्या उत्पन्नात वाढ होईल. यासाठी शासनाने यामध्ये पुढाकार घेऊन असे काम केले

पाहिजे की ज्यामुळे देशातील उद्योग, गुंतवणूक, वस्तु व सेवांना तसेच देशातील समग्र मागणी ला प्रेरणा मिळाली पाहिजे.

**गृहितकांची पडताळणी**:

संशोधकाने केलेल्या संशोधन अभासातून असा निष्कर्ष निघतो की, देशातील समग्र राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीबरोबर बेकारी कमी न होता वाढत आहे (स्तंभलेख ३) आणि ती सुशिक्षित आणि प्रशिक्षित तरुणांमध्ये सर्वाधिक आहे. म्हणून संशोधकाने घेतलेले ग्राहितकृत्य खरे ठरते.

**निष्कर्ष:**

भारतात लोकसंख्या सर्वाधिक असल्यामुळे सहाजिकच तरुणांची संख्याही सर्वाधिक आहे. त्यामुळे या तरुणांचा वापर उत्पादन कार्यात अधिक कार्यक्षमपणे केला तर देशातील साधन सामग्रीचा योग्य वापर होईल आणि देशातील बेकारी कमी होईल. अर्थात त्यासाठी शासनाने पुढाकार घेतला पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1. सुशिक्षित बेरोजगारांच्या समस्या-डॉ. राजेंद्र फकिरराव बगाटे
2. https://www.aajtak.in/business/story/govt-data-claim-unemployment-fell-during-2018-19-compare-to-2017-18-tuta-1078970-2020-06-04
3. भारतातील बेरोजगारांच्या समस्या (संशोधन पेपर)- प्रा. बाळकृष्ण कारु रामटेके
4. भारतीय अर्थव्यवस्था- डॉ. विश्वास कदम,प्रा. गणेश गावंडे (कैलास प्रकाशन, औरंगाबाद)
5. व्यावसायिक पर्यावरण -डॉ. एस. एम. भोसले,आर. जी. कोरबू, प्रोफ. जे. ए. यादव, फडके प्रकाशन, कोल्हापूर
6. आर्थिक पाहणी 2019
7. भारतीय अर्थव्यवस्था व पर्यावरनात्मक अर्थशास्त्र -डॉ. जी. एस. झामरे (पिंपळपुरे अँड के. पबलिशरस नागपूर
8. भारतीय अर्थव्यवस्था - डॉ. गंगाधर वि. कायंदे-पाटील
9. Centre for Sustainable Employment-State of Working India- 2018
10. Annual Annual Report Periodic Labour Force Survey 2017-18 National Statistical Office: OECD
11. Lora Jones, Daniele Palumbo & David Brown, BBC News, 24 January 2021, (IMF
12. https://bh.wikipedia.org/wiki/%E0%A4%AC%E0%A5%87%E0%A4%B0%E0%A5%8B%E0%A4%9C%E0%A4%97%E0%A4%BE%E0%A4%B0%E0%A5%80
13. Business Today, May ०१, २०२०